# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १६ मधील शास्त्रीनगर गेट पासुन ते भोला बिल्डींग पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १६ मधील शास्त्रीनगर गेट पासुन ते भोला बिल्डींग पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,११४/-) या कामाची बी-१ प्रकारची फेर ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १६८/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. १००९५१२) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आहे. सदर कामासाठी एकुण दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन, त्यापैकी निम्नतम दराचे निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५५% दराने कमी असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. ४९,८६,३६६/- (**GST** सह) येत आहे.

**मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची प्राकलन दरापेक्षा ०.२५५% कमी दराची निविदा रक्कम रु. ४९,८६,३६६/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख शहाऐंशी हजार तिनशे सहासष्ट रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक /०३/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिनांक :- 13/03/२०२४

ठराव क्रं. : 870

**भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १६ मधील शास्त्रीनगर गेट पासुन ते भोला बिल्डींग पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.२५५% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ४९,८६,३६६/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख शहाऐंशी हजार तिनशे सहासष्ट रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १६ मधील शास्त्रीनगर गेट पासुन ते भोला बिल्डींग पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.9 मध्ये गणेशनगर व न्हावीपाडा येथे गटार व पाथवेज स्ट्रीटलाईट बसविणे.**

भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.9 मध्ये गणेशनगर व न्हावीपाडा येथे गटार व पाथवेज स्ट्रीटलाईट बसविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९८,११०/- मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक १८/१०/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार क्र./नवि/टे-४/भिनिशमनपा/एस.आर-४१८/२०२४ दि.०९/०२/२०२४ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९८,११०/- ई-निविदा सुचना क्र.१७४/२०२३-२४ (१०१२६७८) दि.२२/०२/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२२/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| २ | तुषार मोहन चौधरी | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७५० % जादा दराने** |

वरील पैकी **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस**, यांची अंदाजपत्रकिय दराची म्हणजेच रक्कम रु.४९,९८,११०/- (अक्षरी एकोणपन्नास लाख अठयाण्णव हजार एकशे दहा मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ७०८

दिनांक :- १३/०३/२०२४

मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकिय दराने म्हणजेच रक्कम रु.४९,९८,११०/- (अक्षरी एकोणपन्नास लाख अठयाण्णव हजार एकशे दहा मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.9 मध्ये गणेशनगर व न्हावीपाडा येथे गटार व पाथवेज स्ट्रीटलाईट बसविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत करारनामा अटी शर्ती नुसार दैनंदिन कचरा संकलन व वहन करण्याच्या कामात मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई ही ठेकेदार संस्था कामात असमर्थ व हलगर्जीपणा करत असल्याने निविदा व करारनामा रद्द करणे बाबत.**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलन व वहन करण्याचे काम जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/४००, दि.२७/०४/२०२२ रोजीच्या कार्यादेशानुसार दि.०१/०५/२०२३ रोजी पासुन मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेमार्फत दैनंदिन घनकचरा संकलन व वहन हे काम सुरु आहे. परंतू नियुक्त ठेकेदार हे सदरचे काम मूळ निविदेतील तसेच करारनामा अटी शर्ती नुसार करत नाहीत. त्यामुळे शहराची संपूर्ण स्वच्छता दैनंदिन वेळेत तसेच त्यानंतरही त्यांच्यामार्फत होत नाही. त्यामुळे शहरात वेळोवेळी स्वच्छतेचा प्रश्न तयार होतो व तक्रारी शिल्लक राहतात. मूलत: ठेकेदाराकडील यंत्रणा ही अपुरी तसेच पूर्ण वेळ काम करत नसलेने शहरात कचरा शिल्लक राहतो. यामधील प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत. मनपाने ठेकेदारास काम सुधारणेची पुरेसी व वाजवी संधी दिलेली आहे. यापूर्वीचे मा. आयुक्त यांच्यासोबत बैठक व त्याचे इतिवृत्त तसेच वेळोवेळी दिलेल्या सर्व नोटीसा यासाठी संदर्भ म्हणुन तपासता येतील.

या ठेकेदाराकडुन फक्त प्रत्यक्ष कामाच्या बाबतीत उणीवा आहेतच, परंतू व्यवस्थापनात देखील सुधारणा नाहीत. यामध्ये खालील प्रमाणे त्रूटींची पूर्तता ठेकेदाराने केलेली नाही.

१. वाहने व चालक, मजूर इत्यादी वेळेवर उपस्थित न ठेवणे. तसेच यासाठी बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली कार्यान्वित न करणे.

२. घनकचरा व्यवस्थापनकामी कार्यरत वाहनांसाठी VTS पूर्ण क्षमतेने कार्यरत न करणे.

३. वाहने अनियमीतपणे चालविणे, वाहने दैनंदिनरित्या पूर्ण दिवस उपस्थित न ठेवणे. तसेच वाहनांचे गैरहजेरीचे प्रमाण जास्त असुन त्याबदल्यात इतर वाहन उपलब्ध करुन दिले जात नाही.

४. व्यवसायिक क्षेत्रात २ वेळा वाहन नियमीतपणे जात नाही, तसेच निविदा अटी शर्तीनुरुप सायंकाळ सत्रात नियमीतपणे वाहने उपस्थित राहून कचरा संकलन करीत नाहीत. रात्र सत्रात दैनंदिनरित्या ५ वाहने पुरविली जात नाहीत. तसेच चिकन/मटन मार्केटचा ओला कचरा उचलणेसाठी स्वतंत्र ३ वाहने पुरविली जात नाहीत.

५. निविदा व करारनामा अटी शर्ती नुसार ठेकेदाराने स्वमालकीची ६ आर सी वाहने पुरविलेली नाहीत.

६. घनकचरा व्यवस्थापनासाठी ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेली वाहने ठेकेदाराच्या स्वमालकिची नाहीत, त्यामुळे ज्यांची वाहने आहेत त्यांना नियमीतपणे भाडे न दिल्याने ते वारंवार वाहने मनपास कोणतीही पूर्व सुचना न देता बंद ठेवतात व पर्यायाने शहरातला कचरा उचलला जात नाही.

७. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहनांचे मनपा मार्फत पुरविण्यात आलेल्या ४७ घंटागाडी वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांचे फिटनेस सर्टीफीकेट सादर केलेले नाहीत.

मनपा मार्फत पुरविण्यात आलेल्या वाहनांचे – २३ आर सी व ३ घंटागाडी वाहनांचे फिटनेस नुतनीकरण केलेले नाहीत.

मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रो. प्रा. लि. – ४९ घंटागाडी, २४ डंपर वाहनांचे फिटनेस केलेले नाहीत.

८. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहनांचे मनपा मार्फत पूरविण्यात आलेल्या वाहनां व्यतिरीक्त इतर कोणत्याही वाहनांचे विमा सादर केलेले नाहीत.

९. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहन चालकांचे वैध वाहन परवाने सादर केलेले नाहीत.

१०. करारनामा अट क्र.६.२.२(k) नुसार मनपा मार्फत पुरविण्यात आलेल्या वाहनांसाठी अधिकृत कंपनी यांच्या बरोबर वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक असताना देखील ठेकेदार संस्थेने याबाबत पूर्तता केलेली नाही. तसेच इतर अधिकृत पुरवठादार किंवा स्वत: मार्फत यंत्रणा स्थापित करुन मनपाची पूर्व परवानगी घेऊन तद्नंतर वाहनांच्या दुरुस्तीचे काम करणे आवश्यक असताना सुद्धा

ठेकेदार संस्थेने मनपाच्या वाहनांसाठी वार्षिक देखभाल करार (AMC) केलेला नाही. तसेच दि.२४/०७/२०२३ रोजीच्या बैठकित मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार ठेकेदार संस्थेने हमी देऊनही वार्षिक देखभाल करार (AMC) बाबतचे दस्तावेज सादर केलेले नाहीत. त्यामुळे मनपामार्फत पुरविलेली सर्व वाहने नादुरुस्त असुन योग्य रीतीने दुरुस्ती न केल्याने वाहनांची दुरावस्था झालेली आहे.

११. करारनामा अट क्र.६.२.२(l) नुसार ठेकेदार संस्था घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत सर्व वाहने कार्यान्वित असलेबाबत सुनिश्चित करेल. तसेच वाहनामध्ये दुरुस्ती किंवा बंद पडल्यास ठेकेदार सदर वाहनाच्या जागी स्वःखर्चाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन सुक्ष्मकृती आराखड्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम बाधीत होणार नाही याबाबत दक्षता घेणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदार संस्थेने याबबात दक्षता घेतलेली नसुन मनपामार्फत पुरविलेली सर्व वाहने कार्यादेशापासुन मध्यंतरी वारंवार व दि.०९/०२/२०२४ पासुन पूर्णपणे बंद ठेवण्यात आली आहेत.

१२. ठेकेदार संस्थेमार्फत नागरिकांकडुन वर्गीकृत केलेला कचरा वर्गीकृतपणे संकलन व वहन केला जात नाही. करारनामा स्थित तक्ता क्र.२ नुसार मनपा कार्यक्षेत्रातील कचरा वर्गीकृतणे संकलन करुन मनपाने निर्धारीत केलेल्या कंपोस्टींग साईटवर सदरचा कचरा संकलन करण्याचे निर्देश ठेकेदारस दिले होते. परंतू मनपाने दिलेल्या निर्देशानुसार वर्गीकृतपणे कचरा संकलन करण्याची कार्यवाही ठेकेदाराने केलेली नाही.

१३. प्रत्येक महिन्याचे कर्मचाऱ्यांचे वेतनाचा तपशील सादर केलेला नाही. त्यामुळे किमान वेतन कायद्यानुसार कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले जाते किंवा कसे याबाबत स्पष्टतः दिसत नाही. तसेच प्रत्येक देयका सोबत इलेक्ट्रॉनिक पेमेंट वितरण केलेले दस्तावेज सादर केलेले नाहीत.

१४. ठेकेदाराने वार्षिक तत्वावर सुक्ष्मकृती आराखडा (मायक्रो प्लान) तयार करुन मनपाच्या प्रकल्प अधिकारी यांचे कडुन तपासणी करुन त्यांची मंजूरी घेऊन त्याप्रमाणे प्रत्येक घरोघरचा कचरा १०० टक्के दैनंदिन संकलन करण्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित होते. परंतू ठेकेदारने याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने वाहनांमार्फत रुट नुसार कचरा संकलन केला जात नाही.

१५. ठेकेदाराने वजनकाटा व क्षेपणभुमीवर सी सी टी व्ही बसविणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदाराने क्षेपणभुमीवर सी सी टी व्ही कॅमेरे अद्याप पर्यंत बसविण्याची कार्यवाही केलेली नाही.

१६. करारनामा अट क्र. २.३.१(h)नुसार ठेकेदाराने घरोघरचा दैनंदिन कचरा घंटागाडीत संकलन करुन तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आलेल्या संकलन केंद्रावर जमिनीला स्पर्श न करता आर सी वाहनामध्ये संकलन करुन क्षेपणभुमी पर्यंत वहन करणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदाराने घंटागाडीतील कचरा संकलन केंद्रावर मोठ्या प्रमाणात संकलन करुन दैनंदिन स्वरुपात संकलन केंद्रावरुन कचरा क्षेपणभुमी येथे वहन केलेला नाही. त्यामुळे प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील साईट नं.५४ या संकलन केंद्रावर साचलेल्या कचऱ्यातून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. तसेच सदर साचलेल्या कचऱ्याला २२ वेळा आग लागल्याने स्थानिक परिसरात धुराचे लोट पसरुन नागरिकांना श्वास घेण्यास मोठ्या प्रमाणात त्रास होत होता. अंततः सदरचा कचरा मनपामार्फत वाहने लावून उचलण्याची कार्यवाही करावी लागली.

१७. मनपा कार्यक्षेत्रातील कचरा संकलन करुन वहन करणाऱ्या वाहनांवर दुर्गंधीनाशक फवारणी करणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदारामार्फत याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कचरा वहन करताना नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो.

१८. करारनामा अट क्र. २.१ व २.२ नुसार ठेकेदाराने कार्यादेशापासुन ६ महिन्याच्या कालावधीत रुट नुसार वर्गीकृत कचरा संकलन करुन वहन करतेवेळेस सदरच्या कचऱ्याची विल्हेवाट लागेपर्यंत वर्गीकृतपणे संकलन करणे बंधनकारक आहे. तसेच नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करणे बंधनकारक असताना ठेकेदाराने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

३०. करारनामा अट क्र.६.२.२(cc)(३) नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची देखभाल पातळी स्वीकृती पातळीपेक्षा जास्त खालावली आहे.

३१. करारनामा अट क्र.६.२.२(cc)(४) नुसार ठेकेदाराने घरोघरचा दैनंदिन १०० टक्के कचरा संकलन करण्यासाठी व नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी आवश्यकतेनुसार पूर्तता केलेली नसुन प्रकल्पासाठी आवश्यक आर सी वाहने, बंदीस्त शरीर वाहने व कचरा वर्गीकृतपणे संकलन करणेच्या बाबींकडे दूर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे ठेकेदारामार्फत कार्यरत घनकचरा व्यवस्थापनाचे काम शहरातील नागरिकांच्या आरोग्यास सुरक्षित नाही.

३२. करारनामा अट क्र.६.२.२(cc)(५) नुसार करारनामा अटी शर्तींचे सतत उल्लंघन होत असल्यास उल्लंघनाचा अर्थ पुढील प्रमाणे :-

करारनामा अट क्र.६.२.२(cc)(५)(१) नुसार प्रकल्प अधिकारी/मनपाने उपाययोजना, पूर्तता व सुधारणा करण्यासंदर्भात नोटीस जारी केलेली असुनही करारनामा तरतुदीनुसार आवश्यकतेनुसार ठेकेदाराद्वारे उल्लंघनाचे निराकरण केले गेले नाही.

करारनामा अट क्र.६.२.२(cc)(५)(२) नुसार प्रकल्प अधिकारी/मनपाद्वारे निराकरणासाठी नोटीस प्रलंबित असताना ठेकेदाराकडून उल्लंघनाची पुनरावृत्ती झालेली आहे.

करारनामा अट क्र.६.२.२(cc)(५)(३) नुसार पूर्वीचे उल्लंघन सुधारले गेले असले तरीही उल्लंघनाची वारंवार घटना, उपाय किंवा सुचना नुसार.

भौतिक उल्लंघनाच्या घटनेनंतर मनपास या कराराअंतर्गत प्रदान केलेल्या इतर कोणत्याही परिणामांबद्दल पूर्वग्रह न ठेवता आणि न जुमानता, भौतिक उल्लंघनाच्या संदर्भात दायित्वाच्या स्वरुपावर अवलंबून, दंड आकारण्याचा आणि त्यानंतर उल्लंघन गंभीर स्वरुपाचे असल्यास हा करार संपुष्टात आणण्याचा अधिकार आहे. त्यानुसार ठेकेदार संस्थेने वारंवार उल्लंघनाची पुनरावृत्ती केलेली आहे.

३३. करारनामा अट क्र. ३.१ नुसार ठेकेदाराने सदरच्या अटी बाबतची पूर्तता कार्यादेशापूर्वी ३० दिवसांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक असताना देखील ठेकेदाराने अट क्र.३.१ ची अंशतः पूर्तता केलेली आहे.

३४. करारनामा अट क्र.३.४(a) नुसार ठेकेदार किंवा मनपा नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे करारनामा अटी शर्तींची पूर्तता न झाल्यास, अटींच्या पूर्ततेसाठी कालावधी वाढविला जाऊ शकतो. परंतू ठेकेदारास अद्याप पर्यंत अनेक वेळा करारनामा अटी शर्तींची पूर्तता करणेकामी मनपाने सवलत दिलेली असताना देखील ठेकेदाराने कोणतीही पूर्तता केलेली नाही.

३५. करारनामा अट क्र.३.४(b) नुसार करारनामा अट क्र.३.१ मधील कोणत्याही अटी शर्तींची पूर्णतः पूर्तता न झाल्यास, तसेच विहित केलेल्या वेळेत किंवा विस्तारीत वेळेत देखील सदरच्या अटी शर्तींची पूर्तता न झाल्यास ३० दिवसांची लेखी नोटीस देऊन हा करार संपुष्टात आणण्याचा अधिकार आहे.

३६. करारनामा अट क्र.३.४(c) नुसार करारनामा अट क्र.३.१ मध्ये नमुद केलेल्या अटींचे समाधान न झाल्यामुळे करारनामा संपुष्टात आल्यास ठेकेदारास कोणत्याही प्रकारे भरपाई दिली जाणार नाही आणि कार्यप्रदर्शन सुरक्षा रक्कम (Performance Security) जप्त केली जाऊ शकते.

३७. ठेकेदाराकडुन कार्यरत कर्मचाऱ्यांची किमान वेतनानुसार देणी, EPF व ESIC बाबतची शासनाची देणी याबाबतची माहिती सादर करणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदार संस्थेने याबाबत कोणतेही अहवाल सादर केलेले नाहीत. त्यामुळे EPF व ESIC व्यतिरिक्त दायित्वाबाबतची ताळमेळ जुळवता आलेली नाही. तरी सदर बाबत कोणत्याही प्रकारचे दायित्व निर्माण झाल्यास ते संबंधीत ठेकेदार संस्थेवर बंधनकारक राहील.

३८. तसेच ठेकेदारावर मनपाने पुरविलेल्या ५० घंटागाडी व २३ आार सी कॉम्पॅक्टर वाहने सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी असताना देखील ठेकेदार संस्थेने सदर वाहने वेळीच दुरुस्ती करुन सुस्थितीत ठेवलेली नाहीत. त्यामुळे त्या वाहनांच्या दुरुस्तीकामी मनपाने निर्माती कंपनीमार्फत सर्वे करण्यात आले असुन त्यानुसार दुरुस्तीसाठी करारनामा अट क्र.६.२.२(l) नुसार १२५ टक्के प्रमाणे रु.५,४४,३८,१८९/- इतका खर्च येत असुन संबंधीत ठेकेदार संस्थेने मनपास अदा करणे बंधनकारक आहे. ठेकेदार संस्थेने

१९. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहने व कचराकुंड्या साप्ताहीक प्रमाणे धुवुन घेणे बंधनकारक आहे. तसेच कचरा कुंडीतून कचरा संकलन करतेवेळेस कचरा उचलण्याआधीचे व नंतरचे फोटो दैनंदिन स्वरुपात मनपाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवणे बंधनकारक आहे. तसेच कचराकुंडीतील कचरा संकलन केले नंतर सदरच्या कुंडीवर व त्या कचरा कुंडीच्या आजुबाजुचा परिसरात दुर्गंधीनाशक व औषधफवारणी करणे बंधनकारक असताना देखील ठेकेदाराने उपरोक्त नमुद प्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

२०. मनपा कार्यक्षेत्रात शासकिय कार्यक्रम, सण किंवा नागरिकांच्या सभा असल्यास ठेकेदारस त्याबाबत निर्देश मिळाल्यास त्याप्रमाणे कामकाजाच्या वेळेत सर्व कचरा संकलन करणे बंधनकारक आहे. परंतू ठेकेदारामार्फत याप्रमाणे कार्यवाही होत नसुन ऐन सणाच्या वेळी, शासकिय कार्यक्रमांच्या वेळी ठेकेदाराची यंत्रणा अनुपस्थित असते. तसेच देयकाबाबत आवश्यक ती पूर्तता न करता व कामात सुधारणा न करता अशा वेळी नागरिकांच्या आरोग्यास वेठीस धरतात.

२१. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांना सुरक्षा संसाधने पुरविणे बंधनकारक असुन सदरची साधने कर्मचाऱ्यांमार्फत वापरत असलेबाबत दक्षता घेणे बंधनकारक असताना देखील ठेकेदाराचे कार्यरत मनुष्यबळ कोणत्याही प्रकारचे सुरक्षा साधने वापरली जात नाहीत.

२२. घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत मनुष्यबळाचे प्रत्येकी ६ महिन्याने वैद्यकीय तपासणी करुन त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांच्या उपस्थिती अहवाला सोबत व त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा केले बाबतचे अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. परंतू ठेकेदारामार्फत याबाबत कोणतीही पूर्तता करण्यात आलेली नाही.

२३. करारनामा अटी शर्तीनुसार ठेकेदार संस्थेमार्फत महिन्यातुन एकदा मोकळा भुखंड किंवा मैदानाच्या स्वच्छता मोहिमेसाठी १० अतिरिक्त कामगार पुरविले जात नाहीत.

२४. घनकचरा व्यवस्थापनासाठी मनपामार्फत पुरविण्यात आलेल्या कार्यरत वाहनांचे देखभालीचे अहवाल अद्यावत ठेवून सदरचे अहवाल प्रकल्प अधिकारी यांचेकडे मासिक स्वरुपात सादर करणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदाराने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ठेकेदार संस्थेने वाहनांच्या दुरुस्तीबाबत कोणतीही दक्षता घेतलेली नसुन सदरची वाहने मोठ्या प्रमाणात नादुरुस्तावस्थेत पडून आहेत.

२५. करारनामा अटी शर्ती नुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम दिनदर्शिकेच्या सर्व दिवशी कार्यरत असणे बंधनकारक असताना देखील ठेकेदारामार्फत मनपास कोणतीही पूर्वसुचना न देता अनेक वेळा काम बंद करण्यात आले आहे. तसेच दैनंदिन स्वरुपात १०० टक्के कचरा संकलन व वहन न करता प्रत्येक वेळेस देयक मिळणेकामी मनपास व नागरिकांच्या आरोग्यास वेठीस धरुन देयक मिळणेकामी काम बंद करण्यात येत आलेले आहे.

२६. ठेकेदाराने घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्प व्यवस्थापक व मनपा अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधणे कामी व संस्था व मनपा यांचेमध्ये समन्वय साधणेकामी अधिकारी/व्यवस्थापक नियुक्त करणे बंधनकारक असताना सुद्धा ठेकेदाराने कोणताही व्यवस्थापक नियुक्त केलेला नाही. तसेच ठेकेदार संस्थेने प्रकल्प व्यवस्थापक ही नियुक्त केलेला नाही.

२७. ठेकेदाराने प्रत्येकी ३० दिवसांनी प्रभाग समिती कार्यालयांना भेट देऊन घनकचरा व्यवस्थापनाचे काम गुणवत्तेनुसार सुरु असलेबाबत खात्री करणे बंधनकारक असताना देखील ठेकेदारने कोणत्याही प्रभाग समिती कार्यालयात कार्यादेशापासुन आजपर्यंत एकही भेट दिलेली नसुन कामच्या गुणवत्तेत व कामात सुधारणा करणेसाठी कोणतीही उपाययोजना केलेली नाही.

२८. करारनामा अट क्र.६.२.२(cc)(१) नुसार ठेकेदारामार्फत नियोजीत वेळेत रुट नुसार कचरा संकलन होत नाही.

२९. करारनामा अट क्र.६.२.२(cc)(२) नुसार ठेकेदारामार्फत करारनामा अटी शर्ती नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची देखभाल होत नाही.

तसे न केल्यास करारनामा अट क्र.६.२.२(l) नुसार सदरचा खर्च संबंधीत ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रकमेतून कपात करण्यात येईल.

तसेच बहुतांश: करारनामा अटी शर्तीचे संबंधीत ठेकेदार संस्थेमार्फत पूर्तता केली जात नसल्याने ठेकेदार संस्थेस जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४/२०२३, दि.११/१२/२०२३ नुसार ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली होती. सदर अंतीम नोटीसचा कालावधी दि.०८/०२/२०२४ रोजी संपुष्टात आला असल्याने त्याच दिवशी मा.उप-आयुक्त सो. (आरोग्य) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठेकेदार संस्थेचे प्रकल्प प्रमुख श्री. रतीश नायर यांनी माहे फेब्रुवारी २०२४ च्या अखेरीस काम बंद करण्याचे मान्य केले असुन सदर बैठकिच्या अनुषंगाने दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रात खालील मुद्दे नमुद केले आहेत.

- आर सी वाहने दोन्ही बाजुंनी तपासणी झाल्यानंतर दुरुस्ती करुन मनपाकडे हस्तांतरीत करण्यात येतील.
- ठेकेदार संस्थेमार्फत मनपास अपेक्षित प्रमाणे EPF व ESIC भरणा केले बाबतचे दस्तावेज, बँक स्टेटमेंट व इतर दस्तावेज पुरवठा व पूर्तता करण्यात येईल.
- मनपाने मान्य केल्या प्रमाणे करारनामा अटी शर्ती व्यतिरिक्त आकारण्यात आलेला दंड शिल्लक देयकासह प्राधान्याने टप्याटप्यात संस्थेस परत केला जाईल जेणे करुन आम्ही सुपुर्द करण्याची प्रक्रिया करु शकु.
- या महिन्याच्या अखेरीस आम्ही मनपा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रकल्प मनपाकडे सुपुर्द करु, त्यानंतर चर्चा केल्याप्रमाणे विभाग आमच्या कंपनीला जोखीम आणि खर्च न देता आमचा करार रद्द करेल आणि आमच्या कंपनीवर कोणतीही कारवाई करणार नाही.

उपरोक्त नमुद प्रमाणे ठेकेदार संस्थेने दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रात मुद्दे नमुद केले आहेत.

➢ त्यानंतर मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मान्यतेने दि.१५/०२/२०२४ रोजी ठेकेदार संस्थेसमवेत झालेल्या बैठकीत मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी ठेकेदार संस्थेस मनपाने पुरविलेली वाहने दुरुस्ती मार्च अखेर पर्यंत दुरुस्ती करुन मनपाकडे सुपुर्द करण्यात यावीत. सदर वाहने विहीत मुदतीत दुरुस्ती न केल्यास सदर वाहनांची दुरुस्ती मनपामार्फत करुन त्यासाठी लागणारा खर्च ठेकेदार संस्थेच्या देयकातून कपात करण्यात यावा. तसेच ठेकेदार संस्थेच्या कार्यरत कर्मचाऱ्यांचे EPF व ESIC भरणा केले बाबतचे व किमान वेतन कायद्यानुसार वेतन बँक खात्यावर वेतन अदा केले बाबतचे अहवाल २ दिवसांत मनपा सल्लागार यांचेकडे सादर करण्याचे निर्देश दिले असताना देखील ठेकेदार संस्थेने याबाबत कोणतीही पूर्तता केलेली नाही.

उपरोक्त नमुद प्रमाणे करारनामा अटी शर्ती नुसार ठेकेदारास करारनामा अटी शर्तीची पूर्तता न करणे, तसेच दैनंदिन कामातील अकार्यक्षमता, बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा या सर्व बाबींचा विचार करता ठेकेदारास करारनामा अट क्र.१३.२(a)(ii) नुसार ठेकेदारस ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली असुन मुद्दा क्र.३६ करारनामा अट क्र. ३.४(c) नुसार ठेकेदार संस्थेची कार्यप्रदर्शन सुरक्षा रक्कम जप्त करुन करारनामा अटी शर्ती नुसार मनपाचे उत्पन्न होणारे दायित्व ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रकमेतुन कपात करणे किंवा ठेकेदार संस्थेमार्फत सर्व दायित्वांची पूर्तता झाले नंतर ठेकेदार संस्थेचे शिल्लक देयक अदा करण्यात येईल. तरी, सदरचा करार रद्द करणेकामी व ठेकेदार संस्थेचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करणेकामी मा.सर्वसाधारणसभेची म्हणजेच सध्यस्थितीत मा. प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचा ठराव घेणे आवश्यक आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ४०८ **दिनांक :-** १३/०३/२०२४

धनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य /४००/२०२२ दि.२७/०४/२०२२ नुसार मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेस कार्यादेश निर्गमीत करण्यात आला होता. संबंधीत ठेकेदार संस्थेमार्फत करारनामा अटी शर्तीची पूर्तता केली जात नसल्याने ठेकेदार संस्थेस जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४/२०२३, दि.११/१२/२०२३ नुसार ६०

दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली असताना सुद्धा ठेकेदार संस्थेच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही. सदर अंतीम नोटीसचा कालावधी दि.०८/०२/२०२४ रोजी संपुष्टात आला असल्याने त्याच दिवशी उप-आयुक्त (आरोग्य) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठेकेदार संस्थेचे प्रकल्प प्रमुख श्री. रतीश नायर यांनी माहे फेब्रुवारी २०२४ च्या अखेरीस काम बंद करण्याचे मान्य केले असुन त्याबाबत दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रात नमुद केले असुन सदर पत्रात खालील प्रमाणे मुद्दे नमुद आहेत.

- आर सी वाहने दोन्ही बाजुंनी तपासणी झाल्यानंतर दुरुस्ती करुन मनपाकडे हस्तांतरीत करण्यात येतील.
- ठेकेदार संस्थेमार्फत मनपास अपेक्षित प्रमाणे EPF व ESIC भरणा केले बाबतचे दस्तावेज, बँक स्टेटमेंट व इतर दस्तावेज पुरवठा व पूर्तता करण्यात येईल.
- मनपाने मान्य केल्या प्रमाणे करारनामा अटी शर्ती व्यतिरिक्त आकारण्यात आलेला दंड शिल्लक देयकासह प्राधान्याने टप्याटप्यात संस्थेस परत केला जाईल जेणे करुन आम्ही सुपुर्द करण्याची प्रक्रिया करु शकु.
- या महिन्याच्या अखेरीस आम्ही मनपा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रकल्प मनपाकडे सुपुर्द करु, त्यानंतर चर्चा केल्याप्रमाणे विभाग आमच्या कंपनीला जोखीम आणि खर्च न देता आमचा करार रद्द करेल आणि आमच्या कंपनीवर कोणतीही कारवाई करणार नाही.

उपरोक्त प्रमाणे ठेकेदार संस्थेने दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

- ➢ त्यानंतर दि.१५/०२/२०२४ रोजी ठेकेदार संस्थेसमवेत झालेल्या बैठकीत मनपाने पुरविलेली ५० घंटागाडी व २३ आर सी कॉम्पॅक्टर वाहने ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावल्यापासुन दुरुस्ती सुरु करणे अपेक्षित असताना सुद्धा ठेकेदार संस्थेने सदर वाहनांच्या दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसुन सदर वाहनांच्या दुरुस्तीसाठी मार्च अखेर पर्यंतचा कालावधी देण्यात येत असुन वाहनांची निर्माती कंपनी मार्फतच वाहनांची दुरुस्ती करुन सदर कंपनीचे दुरुस्ती केलेबाबतचे प्रमाणपत्र व मनपाच्या वाहन विभागाचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सह मनपाकडे सुपुर्द करण्यात यावीत. तसेच ठेकेदार संस्थेने काम बंद केल्यानंतर मनपाची ५० घंटागाडी व २३ आर सी वाहने ठेकेदार संस्थेने विहीत वेळेत दुरुस्ती करुन मनपास हस्तांतरीत न केल्यास सदर वाहनांच्या दुरुस्तीच्या कालावधीसाठी त्या वाहनांच्या जागी पर्यायी वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी लागणारा खर्च व सदर वाहने विहीत मुदतीत दुरुस्ती न केल्यास सदर वाहनांची दुरुस्ती मनपामार्फत करुन त्यासाठी लागणारा खर्च आणि २३ आर सी वाहनांच्या फिटनेस नुतनीकरणाचा खर्च ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रक्कमेतून कपात करण्यात यावा. तसेच माहे मार्च २०२४ पर्यंत सदर वाहने दुरुस्ती करुन ठेकेदार संस्थेने मनपास हस्तांतरीत न केल्यास ठेकेदार संस्थेवर नियमोचित कारवाई व फौजदारी कारवाई करण्यात यावी.
- ➢ तसेच ठेकेदार संस्थेच्या कार्यरत कर्मचाऱ्यांचे EPF व ESIC भरणा केले बाबतचे व किमान वेतन कायद्यानुसार वेतन बँक खात्यावर वेतन अदा केले बाबतचे अहवाल २ दिवसांत मनपा EPF सल्लागार यांचेकडे सादर करण्याचे निर्देश दिले असताना देखील ठेकेदार संस्थेने याबाबत कोणतीही पूर्तता केलेली नसल्याने EPF व ESIC बाबतची रक्कम शासनाकडे मनपामार्फत भरणा करुन त्याचा खर्च ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रक्कमेमधुन कपात करण्यात यावा.

उपरोक्त नमुद करारनामा अटी शर्ती नुसार ठेकेदारास करारनामा अटी शर्तींची पूर्तता न करणे, तसेच दैनंदिन कामातील अकार्यक्षमता, बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा या सर्व बाबींचा विचार करता ठेकेदारास करारनामा अट क्र.१३.२(a)(ii) नुसार जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४, दि.११/१२/२०२३ नुसार ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली असताना सुद्धा व तद्नंतर पुरेसा कालावधी देऊनही ठेकेदार संस्थेने घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात कोणतीही सुधारणा केलेली नाही व करारनामा अटी शर्तींनुरुप कोणतीही पूर्तता केलेली नाही. त्यामुळे ठेकेदार संस्थेस बजावण्यात आलेल्या अंतीम नोटीसच्या अनुषंगाने व वर नमुद मुद्दा क्र.३६ करारनामा अट क्र. ३.४(c) नुसार ठेकेदार संस्थेची कार्यप्रदर्शन सुरक्षा रक्कम (परफॉर्मन्स सिक्योरीटी)

जप्त करुन सदरचा करारनामा रद्द करण्याच्या अट क्र.१३.२ नुसार ठेकेदार संस्थेचा करारनामा रद्द करणेकामी व करारनामा रद्द केल्यानंतर ठेकेदार संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे दायित्व, शासनाचे दायित्व, मनपाचे दायित्व व इतर दायित्व उत्पन्न झाल्यास ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रक्कमेतून कपात करणे व तद्नंतर सुद्धा यापैकी कोणतेही दायित्व उत्पन्न झाल्यास ठेकेदार संस्थेच्या जंगम मालमत्ता व स्थावर मालमत्ता संबंधीत ठेकेदार व त्यांचे वारस यांचेकडून जप्त करण्याचे अधिकार मनपास राहतील, याबाबत प्रस्ताव सादर करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग२)/ नवि, दि. ०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ) व (१ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार ( महासभा व स्थायी समितीचे अधिकार) **मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त,** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी नियुक्त **मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई** या ठेकेदार संस्थेस करारनामा अटी शर्ती नुरुप दैनंदिन कामातील अकार्यक्षमता, हलगर्जीपणा, अपूर्तता व उपरोक्त नमुद करारनामा अटी शर्तीनुरुप पूर्तता न केल्याने ठेकेदार संस्थेस करारनामा अटी शर्तीनुसार जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४, दि.११/१२/२०२३ अन्वये बजावण्यात आलेल्या ६० दिवसांच्या अंतीम नोटीसच्या अनुषंगाने सदर ठेकेदार संस्थेची निविदा व करारनामा रद्द करण्याच्या व करारनामा रद्द केल्यानंतर ठेकेदार संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे दायित्व, शासनाचे दायित्व, मनपाचे दायित्व व इतर दायित्व उत्पन्न झाल्यास ठेकेदार संस्थेच्या शिल्लक रक्कमेतून कपात करणे किंवा ठेकेदार संस्थेमार्फत मनपाच्या सर्व दायित्वांची पूर्तता झाले नंतर ठेकेदार संस्थेचे शिल्लक देयक अदा करण्यात यावे व तद्नंतर सुद्धा यापैकी कोणतेही दायित्व उत्पन्न झाल्यास ठेकेदार संस्थेच्या जंगम मालमत्ता व स्थावर मालमत्ता संबंधीत ठेकेदार व त्यांचे वारस यांचेकडून जप्त करण्याचे अधिकार मनपास राहतील. तसेच उपरोक्त नमुद दायित्वांची ठेकेदार संस्थेने पूर्तता केल्यानंतर ठेकेदार संस्थेचे शिल्लक देयक अदा केले जाईल. तरी, सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय:- भिवंडी नि.श.महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रं.२ मिल्लतनगर उदयान आरक्षण क्रं.५१ विकसित करणे.(महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास २०२३-२४,)**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,३६६/- करिता ई-निविदा सुचना क्र.१८३/२०२३-२४, टेंडर नं.१०१८७८८ दिनांक २७/०२/२०२४ ते ०५/०३/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.०६/०३/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली. सदरच्या कामासाठी २ निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदांचे छाननी अंती दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे २ निविदा, निविदा समितीने पात्र ठरविण्यात आल्या. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक ०८/०३/२०२४ रोजी दु./साय.०५.२९ मि.उघडण्यात आली असून एकूण प्राप्त २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| **१** | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायझेस, भिवंडी.** | **अंदाजपत्रकीय दराने** | **४९,९९,३६६.१६** |
| २ | तुषार मोहन चौधरी, भिवंडी. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के जादा दराने | ५०,२४,३६२.९९ |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार मे.हिंदुस्तान इंटरप्रायझेस, भिवंडी. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रुपये ४९,९९,३६६/-( रुपये एकोनपन्नास लाख नव्यांनवद हजार तिनशे सहासष्ठ) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** ४०६ **दिनांक :-** १२/०३/**२०२४**

मे.हिंदुस्तान इंटरप्रायझेस, भिवंडी. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने रक्कम रुपये ४९,९९,३६६/-( रुपये एकोनपन्नास लाख नव्यांनवद हजार तिनशे सहासष्ठ) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी नि.श.महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रं.२ मिल्लतनगर उदयान आरक्षण क्रं.५१ विकसित करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.हिंदुस्तान इंटरप्रायझेस, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

o/c

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- मे.नांदी कम्युनिटी वॉटर सव्हिसेस मार्फत शुध्द पिण्याचे पाण्यासाठी (पेयजल प्रकल्प) आर.ओ.प्लान्ट उभारणेबाबत कामाच्या ठरावास मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्जंतूक व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करणे भिवंडी महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. मे.नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हिसेस,कोल्हापुर या संस्थेमार्फत पेयजला पासून वंचित असलेल्यांना शाश्वत मार्गाने पिण्याचे शुध्द पाणी व स्वच्छ पाणी पुरवणेचे काम केले जाते. नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हिसेस यांचे मार्फत भिवंडी महानगरपालिकेच्या सहयोगाने रिव्हर्स ऑस्मोसिस जल शुध्दीकरण केंद्र उभारले जाते. या जलशुध्दीकरण केंद्रामार्फत ६ प्रक्रियेतुन शुध्द होणारे पाणी नागरीकांना उपलब्ध होणार आहे. या संस्थेमार्फत भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मंडई दगडी शाळेच्या आवारात प्रकल्प सुरु झाले नंतर ७ वर्षानंतर देखभाल दुरुस्ती व काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास त्याची पुर्ण जबाबदारी या संस्थेची राहील. प्रकल्प सुरु झालेनंतर ७ वर्षानंतर सदर प्रकल्प हा भिवंडी महानगरपालिकाकडे हस्तांतरीत करणेत येईल. यानंतर या प्रकल्पाची संपुर्ण जबाबदारी ही महानगरपालिकेची राहील. सदर संस्थेस **२० X २०** फुटाची जागा उपलब्ध करून देणे आवश्यक असून जागेत (**१३ X १३**) व (**७ X ७**) फुटाचे बांधकाम थ्री फेज कनेक्शनसाठी होणारा खर्च, प्रति माहे येणारे लाईट बिल हा सर्व खर्च संस्था स्वत: करणार असुन उपरोक्त ठिकाणी पाणी उपलब्ध नसल्यास संस्था स्वत: खर्चाने बोअरवेल करुन पाण्याचा वापर करणार आहेत. सदर पाण्याचा वापर मनपाशाळेतील मुलांना विनाशुल्क व तेथील नागरीकांना ७ रुपयाला २० लिटर पाणी या दराने शुध्द पाणी देणार आहे.

भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना अल्प दराने शुध्द व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असल्याने मे.नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हिसेस,या संस्थेच्या वतीने स्वत: पाणी उपलब्ध करून मंडई येथील दगडी शाळेच्या आवारात रिव्हर्स ऑस्मॉसिस जल शुध्दीकरण केंद्र (वॉटर फिल्टेशन प्लॅन्ट) बसविणेबाबत कामास मा.आयुक्त सो, यांनी मंजूरी देणेत आली आहे. त्यासाठी संस्थेस **२० x २०** फुटाची जागेवर सदर संस्थेने आर.ओ.प्लान्ट उभारणेकामी व प्लान्टकरीता वापरण्यात आलेल्या विद्युतचे येणारे वीज देयक भरणे, मनुष्यबळ पुरविणे सदर संस्थेस करणे बंधनकारक आहे. सदर जागेचे संस्थेकडुन प्रती वार्षीक भाडे रु.१० हजार आकारणे तसेच रु.१० हजार अनामत रक्कम जमा करुन घेणे तसेच ७ वर्षानंतर सदर प्रकल्प भिवंडी महानगरपालिकेस हस्तांतरण करुन घेणे, मा.आयुक्त सो यांनी दि.०७/०३/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. भिवंडी महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हीसेस कोल्हापुर या संस्थेमार्फत वॉटर प्लॅन्ट उभारणेकामी ठरावाव्दारे मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव.

**ठराव क्रमाक** ४०६ **दिनांक**१२/०३/**२०२४**

मे.नांदी कम्युनिटी वॉटर सव्हिसेस मार्फत पिण्याचे पाण्यासाठी शुध्द (पेयजल प्रकल्प) आर.ओ.प्लान्ट उभारणेबाबत कामाच्या प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी नि.शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना ७ रुपयात २० लिटर शुध्द व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असल्याने, मे.नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हिसेस, या संस्था स्वत: पाणी उपलब्ध करुन

दगडी शाळेच्या आवारात शुध्द (पेयजल प्रकल्प) आर.ओ.प्लान्ट उभारणेसाठी संस्थेस **२० x २०** फुटाची जागा भाडेतत्वावर वापरास देणे व जागेकरीता संस्थेकडुन वार्षीक भाडे रु.१० हजार आकारणे तसेच रु.१० हजार अनामत रक्कम जमा करुन घेणे. प्लान्टकरीता वापरण्यात येणारे विजेचे विज देयक भरणे व प्लॅन्ट चालविणे करीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणे संस्थेस बंधनकारक आहे. तसेच ७ वर्षानंतर सदर प्रकल्प सुस्थितीत भिवंडी महानगरपालिकेच्या नावे हस्तांतरण करुन घेणेस. मे.नांदी कम्युनिटी वॉटर सर्व्हीसेस, कोल्हापुर या संस्थेमार्फत वॉटर प्लॅन्ट उभारणेबाबत प्रस्तावास स्विकृत करून मान्यता देणेत येत आहे.

**(अजय वैद्य )**

**प्रशासक तथा आयुक्त**

O/C

**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**